# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


**प्रेसनोट २३२- २३** **दिनांक : - २७/०७/२०२३**

## "जुन" महिन्यामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पोलीस अधिकारी / अंमलदार यांचा मासिक गुन्हे आढावा बैठकीत मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार.

१) उत्तन सागरी पोलीस ठाणे हद्दीमधील पातान बंदर समुद्रकिनारी येथे दिनांक ०२/०६/२०२३ रोजी सकाळी ८:०० वा. चे पूर्वी एक अनोळखी महिला वय अंदाजे २५ ते ३० वर्षे, अंगात मरून रंगाचा हाफ बाहयांचा टी शर्ट व काळसर रंगाची हाफ पँट हीस कोणीतरी अज्ञात इसमांनी अज्ञात कारणावरून जीवे ठार मारून तिचे मुंडके शरीरापासून वेगळे करून शरीराचे धडाचे दोन तुकडे करून बँगेमध्ये भरून तिची ओळख पटु नये या उद्देशाने सदर बँग समुद्रामध्ये कुठेतरी फेकुन दिलेबाबत पालीगावचे पोलीस पाटील श्री. मेलवीन पावलु अंद्रादे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून उत्तन सागरी पोलीस ठाणेत गु.रजि.क्र. I ६५/२०२३ भां.दं.वि.सं कलम ३०२, २०१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्ष्यात घेवून श्री.जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०१ यांनी परिमंडळ १ मधील पोलीस ठाणेत कर्तव्यास असलेल्या गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांना गुन्हयाच्या घटनास्थळी बोलावून गुन्हा उघडकीस आणण्याच्या दृष्टीने सुचना व मार्गदर्शन केले होते.

त्याअनुषंगाने काशिमिरा व नवघर पोलीस ठाणेतील गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी अनुक्रमे सपोनि प्रशांत गांगुर्डे, पोउनि अभिजित लांडे व त्यांचे पथकातील अंमलदार यांनी मयताचे हातावरील टॅटूच्या आधारे तसेच तांत्रिक विश्लेषणातुन प्राप्त माहितीचे आधारे अनोळखी मयत हिची ओळख पटवुन तिचे नाव श्रीमती अंजली मिंटु सिंग, वय २३ वर्षे, रा. राज अपार्टमेंट, डांबर प्लँट जवळ, राजवली गांव रोड, नायगांव (पुर्व) असे असल्याचे निष्पन्न केले. त्यानंतर नमुद गुन्ह्यात आरोपीत नामे १) मिंटु रामब्रिज सिंग, वय ३१ वर्षे, व्यवसाय सिक्युरीटी गार्ड, रा. राज अपार्टमेंट, डांबर प्लँट जवळ, राजवली गांव रोड, नायगांव (पुर्व), २) चुन चुन रामब्रिज सिंग, वय ३५ वर्षे, व्यवसाय सिक्युरिटी सुपरवायजर रा. महाविर नगर, पुष्पा हॅरिटेज, डहाणुकरवाडी रोड, HDFC बँकेसमोर, कांदिवली (प), मुंबई यांना ताब्यात घेवून तपास केला असता त्यांनी वर नमूद गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने दोन्ही आरोपीतांना पुढील तपासकामी उत्तन सागरी पोलीस ठाणे येथे हजर करण्यात आले आहे. नमूद महिलेस चारित्र्याचे संशयावरून ठार मारले असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले.

सदरची कामगिरी करणारे उतन पोलिस ठाणेचे वपोनि श्री दादाराम सुभाष करांडे,स.पो.नि. प्रशांत गांगुर्डे, महेश मनोरे, पो.उप.नि. अभिजित लांडे, संदिप यादव, प्रदिप उबाळे, कुणाल कुरेवाड, स.फौ. अनिल पवार, मंगेश शिंदे, पो.हवा. भुषण पाटील, सुरेश चव्हाण,नवनाथ घुगे, निलेश शिंदे, संजय कोंडे, राजेश आसवले, प्रदीप गवळी, रवींद्र बागुल,जयप्रकाश जाधव, पोलीस अंमलदार रवी कांबळे, हनुमंत माने, घुणावत, विनोद जाधव,ओंकार यादव यांचा दिनांक २७/०७/२०२३ रोजी मा. श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-

विरार यांनी मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **“ जुन महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल” क्रमांक-१** म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवुन **मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय** यांनी सत्कार केला आहे.



मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना व.पो.नि.श्री. दादाराम करांडे

२) दिनांक १९/०६/२०२३ रोजी सकाळी ०५.३० वा ते ०६.०० वा. सुमारास फिर्यादी हे आचोळे येथील स्मशानभुमी रोड, ड्रीमलँड हॉटेलच्या मागे, वसई पुर्व, ता. वसई, जि. पालघर येथे वॉकिंग करीत असतांना यातील आरोपीत हे एफ झेड कंपनीची मोटार सायकलवर येवुन त्यापैकी अंगामध्ये ऑरेंज रंगाचा टी शर्ट व तोंडाला मास्क घातलेला अशा वर्णनाचे पाठीमागे बसलेल्या इसमाने फिर्यादीच्या गळयातील १० ग्रॅम वजनाची सोन्याची चैन जबरीने खेचुन ड्रीमलँड हॉटेलकडे भरधाव वेगाने निघुन गेले. त्याबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक १९/०६/२०२३ रोजी आचोळे पोलीस ठाणेत आरोपीतांविरुध्द गुरक्र. ३०९/२०२३ भादविसं कलम ३९२,३४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता. त्यासुमारास माणिकपुर व वालीव परिसरात देखील याचसारखी सोन्याची चैन जबरीचे खेचुन नेलेची घटना घडली होती.

मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयात एकाच दिवशी सलग एकापाठोपाठ एक अशा ०३ चैन चोरीच्या घटना घडल्या. त्यामुळे अशा गुन्हयांना आळा घालणे व घडलेले गुन्हे उघडकीस आणणेबाबत वरिष्ठांनी तात्काळ मार्गदर्शन व सुचना देवून पथके रवाना केली.

त्याअनुषंगाने मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखाचे अधिकारी व अंमलदार यानी घडणाऱ्या प्रत्येक चैन स्नॅचिंग गुन्हयाचे घटनास्थळी समक्ष भेटी दिल्या व तांर्त्रिक विश्लेषन करुन परिक्षण केले होते. त्याअनुषंगाने गुन्हयातील आरोपी यांचा आंबिवली पर्यंत माग घेण्यात आला. सदर ठिकाणी आरोपीबाबत गुप्त बातमीदारामार्फत माहिती प्राप्त केली असता आरोपी नामे अली हसन अफसर उर्फ अबु जाफरी, वय २४ वर्ष, राह. गल्ली नं ४, सुपर स्टार बेकरीच्या पाठीमागे, पाटील नगर, आंबवली पश्चिम, कल्याण, जि. ठाणे हा असल्याचे निष्पन्न झाले असता वरिरष्ठांचे मार्गदर्शनाने आंबिवली परिसरात जावून ईराणी वस्तीमध्ये नमुद आरोपीत याचे ठाव ठिकाणाबाबत माहिती काढून स्थानिक पोलीसांच्या मदतीने आरोपीताचे रहात्या घरी सापळा कारवाई केली असता आरोपी घराच्या मागील खिडकीतून उडी मारुन आंबीवली येथील जंगलाच्या दिशेने पळून गेला. त्यावेळी सपोनि दत्तात्रय सरक व पोलीस पथक यांनी सदर आरोपीचा जंगलाच्या दिशेने पाठलाग केला. सदर जंगलात आरोपीचा शोध घेणेसाठी सर्व पोलीस स्टाफ वेगवेगळया दिशेने गेले असता पोहवा/ शिवाजी पाटील यांनी दलदलीत लपलेल्या आरोपीस शिताफिने ताब्यात घेत असताना आरोपी व त्यांच्यात झटापटी झाली त्यावेळी उर्वरीत पोलीस स्टाफच्या मदतीने आरोपीस ताब्यात घेवून नमुद गुन्हयात अटक करण्यात आलेले आहे.

नमुद अटक आरोपीत याचेकडे पोलीस कोठडीदरम्यान तपास केला असता आरोपीने जबरी चोरी (चैन स्नॅचिंग) चे ०७ गुन्हे, जबरी चोरी (मोबाईल स्नॅचिंग) चे ०२ गुन्हे व नमुद गुन्हयात चोरी करण्याकरता वापरलेली

मोटार सायकलीसह (वाहन चोरी) चे ०२ गुन्हे असे एकुण ११ गुन्हे केल्याचे तपासात निष्पन्न झाले असुन गुन्हयात चोरीस गेलेले ७१ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, ०२ मोबाईल फोन व ०२ मोटार सायकल असा एकुण ५,९०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश आलेले आहे.

नमुद अटक आरोपीत हा सराईत गुन्हेगार असुन त्याचे विरुध्द यापुर्वी ठाणे शहर हद्दीत जबरी चोरी व वाहन चोरीचे एकुण ०९ गुन्हे दाखल आहेत. तसेच ठाणे शहर आयुक्तालयातील दोन पोलिस ठाण्यातील गुन्हयात तो पाहिजे आरोपी आहे.

सदरची कामगिरी करणारे मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी अधिकारी पो.नि. श्री. राहुल राख, सपोनि दत्तात्रय सरक, पोहवा शिवाजी पाटील,गोविंद केंद्रे,राजाराम काळे, सतिश जगताप, आसिम मुल्ला, महेश वेल्हे, संग्राम गायकवाड, अनिल नागरे, जयकुमार राठोड,मनोहर तावरे, सुनिल कुडवे, हनुमंत सुर्यवंशी यांचा मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **" जुन महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल" क्रमांक-२** म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवुन **मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय** यांनी सत्कार केला आहे.



मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना पोनि श्री. राहुल राख

३) माणिकपुर पोलीस ठाणे गुन्हा रजि नं I १२६/२०२३ भा.दं.वि.सं कलम ४५४, ४५७, ३८० अन्वये दाखल गुन्हयातील फिर्यादी नामे श्री. रहिम इस्माईल डायअथर, रा. रूम.नं.डी १/१०३ युनिक पार्क दिनदयाल नगर, वसई पश्चिम ता .वसई जि.पालघर यांचे राहते घराचे दरवाजाचा कडी कोयंडा दिनांक ०१/०३/२०२३ रोजी ११.०० वा. ते दिनांक ०३/०४/२०२३ रोजी ०६.०० वाजेच्या सुमारास अज्ञात चोरटयाने कशाचे तरी सहाय्याने तोडुन त्याव्दारे घरात प्रवेश करुन घरातील १,९५,०००/- रुपये किंमतीचे सोन्याचे दागीने घरुफोडी करुन चोरी करुन नेल्याबाबत माणिकपुर पोलीस ठाण्यात दिनांक ०३/०४/२०२३ रोजी २२.३७ वाजता फिर्यादी यानी दिलेल्या फिर्यादी वरुन गुन्हा दाखल करण्यात आला होता.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे हद्दीमध्ये सतत होणा-या घरफोडी चोरींचे प्रमाण वाढत असल्याने सदर घरफोडयांवर आळा घालणेबाबत वरीष्ठांनी आदेशीत केले होते. त्या अनुषंगाने घडणा-या

प्रत्येक घरफोडीच्या गुन्हयाचे  ठिकाणी प्रत्यक्ष भेट देवून घटनास्थळावरील सी. सी. टी. व्ही. फुटेजचे परीक्षण गुन्हे शाखा कक्ष २, वसई यांचे मार्फतीने करण्यात येत होते. त्या अनुषंगाने माणिकपुर पोलीस ठाणे १२६/२०२३ भादविस कलम ४५४, ३८० अन्वये दाखल गुन्हयातील दिवसा घरफोडी चोरीच्या गुन्हयांतील सी. सी. टी. व्ही. फुटेज मधील अनोळखी आरोपीताचा माग घेवून त्या परिसरातील तांत्रिक विश्लेषणाव्दारे आरोपीत नामे रोहीत उर्फ अरहान चेतन शेट्टी, वय २१ वर्षे, रा. कानका खलल पाडा, शिवशक्ती स्टोअरच्या समोरचा बंगला, म्हाप्सा, साऊथ गोवा, राज्य-गोवा. यास  निष्पन्न करुन आरोपीत यास म्हापुसा, राज्य गोवा येथून ताब्यात घेवून तपास केला असता त्याने वर नमुद गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास सदर गुन्हयात दिनांक २७/०६/२०२३ रोजी अटक करण्यात आले होते.

सदर आरोपीत यांने माणिकपुर पोलीस ठाण्याचा ०१ गुन्हा, विरार पोलीस ठाण्याचे ६ गुन्हे, तुळींज पोलीस ठाण्याचे ३ गुन्हे, पेल्हार पोलीस ठाण्याचा १ गुन्हा, नायगाव पोलीस ठाण्याचा १ गुन्हा असे एकुण १२ घरफोडीचे गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले आहे.

अटक आरोपीत याचेकडुन उघडकीस आणलेल्या घरफोडीच्या १२ गुन्हयात १५ तोळे सोने, २ चांदीच्या समई, २ चांदीचे पैजण, चांदीची जोडवी, १० चांदीची नाणी, १५,०००/- रुपये रोख रक्कम, १ मोबाईल आणि आय फोन तसेच रीअल मी मोबाईलचे २ चार्जर असा एकुण ८,६५,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी करणारे गुन्हे शाखा-२ वसई युनीटचे पोलीस निरीक्षक शाहुराज रणवरे, स.पो.नि. सुहास कांबळे, सागर शिंदे, स.फौ. संजय नवले, रमेश भोसले, पो.हवा. प्रफुल्ल पाटील, चंदन मोरे, सचिन पाटील, जगदीश गोवारी, रमेश आलदर, सुधीर नरळे, दादा आडके, पो.ना. प्रशांतकुमार ठाकुर, पो.अंम.अमोल कोरे तसेच सायबर गुन्हे शाखेचे  स.फौ. संतोष चव्हाण  त्यांचा मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **“जुन महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल” क्रमांक -३** म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवुन **मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय** यांनी सत्कार केला आहे.



मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना पोनि श्री. शाहुराज रणवरे

४) अंमली पदार्थ विरोधी पथकाचे प्रभारी पो.नि. श्री. अमर मराठे व पोलीस स्टाफ हे दिनांक ०७.०६.२०२३ रोजी जी. सी. सी. क्बल हाटकेश ते बाबा टायर बाजुकडे मिरारोड (पुर्व) येथे गस्त करीत असताना एक परकीय नायजेरीन इसम हा त्याचे खांदयावर ब्राउन रंगाची हॅन्डबॅग अडकवलेल्या स्थितीत संशयास्पद आढळुन आल्याने वर

नमुद स्टाफ यांनी कायदेशीर बाबींची पुर्तता करुन त्यास ताब्यात घेत असताना तो पळुन जाण्याचा प्रयत्न करीत होता. पोलीस स्टाफने सदर इसमास शिताफीने ताब्यात घेवुन त्याची झडती घेतली असता त्याचे कब्ज्यात ५०३ ग्रॅम वजनाचा ०१,००,६०,०००/-रु. किंमतीचा मॅफेड्रॉन हा अंमली पदार्थ विक्री करीता बाळगला असल्याचे निदर्शनास आले. सदर नयजेरीयन इसम नामे नावाफोर डोनेटस आझोर याचे विरुध्द काशिमीरा पोलीस ठाणेत गुन्हा रजि. क्र. ।। ४१३/२३ एन.डी.पी.एस कायदा १९८५ चे कलम ८ (क), २२ (क) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.सदर गुन्हाचे चालु असताना वर नमुद अटक आरापी याने पाहिजे आरोपी च्युकवुजिके अन्यान्वु याचेकडुन अंमली पदाथे खरेदी केल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदरची कामगिरी करणारे अंमली पदार्थ विरोधी पथकाचे प्रभारी पो.नि. अमर मराठे, स.पो.नि.विलास कुटे, पो.हवा. इंगळे, टक्के, पाटील, आव्हाड, सपकाळ, म.पो.हवा. एक्कलदेवी, पो.अंम. यादव तसेच स.फौ. संतोष चव्हाण, नेम. सायबर शाखा यांचा **“जुन महिन्यातील उकल म्हणुन स्पेशल रिवॉर्ड” क्रमांक-१** देवुन **मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय** यांनी सत्कार केला आहे.



मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना पो.नि. श्री. अमर मराठे

५) गुन्हयातील फिर्यादी नामे श्री आवेश फारुख मोहम्मद वय ३५ वर्षे, व्यवसाय – सेट्रींग वर्क, रा. विर सावरकर गार्डन जवळ, सेंट ॲनी स्कुल, एल.टी.मार्ग, बोरीवली पश्चिम,मुंबई मुळ रा. ग्राम - बेहरा, पो - चौकी हरिपूर, ठाणा - कंदवा, पंचायत – चौनी जि. कटिहारा, राज्य बिहार यातील फिर्यादी यांचा भाऊ नामे मोईन मोहम्मद व त्याचे सोबत एकाच शेड मध्ये राहणारा अरबाज आलम असे दिवाणमान वसई पश्चिम येथील कासा द टेरेजा या साईडवरील पत्र्याचे शेड मध्ये स्वयंपाक करीत असताना अरबाज आलम वय सु. २५ वर्षे, रा. जि.कटीहार,राज्य बिहार याने त्याचे कामाचा संपूर्ण पगार न मिळाल्याच्या कारणावरुन फिर्यादी यांचा मयत भाऊ मोईन मोहम्मद याचे चेह-यावर, गळ्यावर व डोक्यात लाकडी फळीने (लाकडी लाफा) मारहाण करुन साध्या व गंभीर दुखापती करुन त्यास जिवे ठार मारलेले आहे म्हणून फिर्यादी यांनी दिले तक्रारीवरुन नमुद प्रमाणे गुन्हा नोंद केला होता.

सदर गुन्हयातील आरोपीत हा इसम नामे मोईन मोहम्मद याचा खुन करुन सदर ठिकाणाहुन फरार झाला होता. सदर गुन्हयात आरोपी नामे अरबाज याची कोणतीही माहीती नसताना तर्क व सी.सी.टी.व्ही. फुटेजच्या आधारे कसोशिने शोध घेवुन १२ तासाच्या आत त्यास लोकमान्य टिळक टर्मिनल, मुंबई येथुन ताब्यात घेवुन अटक करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी करणारे माणिकपुर पोलिस ठाणेचे वपोनि श्री.संपतराव पाटील,सपोनि सचिन सानप,पोउपनिरी तुकाराम भोपळे,पोहवा शैलेश पाटील,शामेश चंदनशिवे, धनंजय चौधरी,अनिल चव्हाण,प्रविण कांदे

यांचा **“जुन महिन्यातील गुन्हयाची उकल म्हणुन स्पेशल रिवॉर्ड ” क्रमांक-२** देवुन **मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय** यांनी सत्कार केला आहे.



मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना व.पो.नि. श्री. संपतराव पाटील

६) वालीव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक २१/१०/२०२० रोजी १९.३० वा. चे. दरम्यान मोर्यानाका सातिवली, समतानगर, वसई पुर्व येथुन अज्ञात आरोपीत याने गुन्हयातील अल्पवयीन मुलीस तिच्या अज्ञानाचा फायदा घेवुन तिस कशाचे तरी अमिष दाखवुन फिर्यादीचे कायदेशीर रखवालीतुन फुस लावुन पळवुन नेलेबाबत तक्रार प्राप्त झाल्याने अज्ञात आरोपीताविरुध्द वालीव पोलीस ठाणेत गुन्हा रजि. क्र. I ८७४/२०२० भा.दं.वि.सं. कलम ३६३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे तपासादरम्यान गुन्हयातील अपहरीत अल्पवयीन मुलगी हीस आरोपीत नामे राजा रामबीर यादव मुळ रा. इंदीरा नगर, ता. सदर, जि. फिरोझाबाद राज्य-उत्तर प्रदेश याने तिचा अज्ञानाचा फायदा घेवुन तिस कशाचे तरी अमिष दाखवुन फिर्यादीचे कायदेशीर रखवालीतुन फुस लावुन पळवुन नेलेबाबत निष्पन्न झाले होते. सदर गुन्हयाचे तपासाचे अनुषगांने वालीव पोलीस ठाण्याचे पोलीस पथक हे वारवांर आरोपीत याचे मुळ गावी जावुन आरोपीत व अपहरीत मुलीचा शोध घेत होते. परंतु आरोपीत व यातील अपहरीत अल्पवयीन मुलीबाबत काहीएक माहिती मिळुन येत नव्हती व आरोपीत हा गुन्हा केल्यापासुन त्याचे नातेवाईक अथवा मित्र मंडळी यांचे कोणाचेही संपर्कात नसल्याने गुन्हयाची उकल होत नव्हती. गुन्हयातील अपहरीत मुलगी व आरोपीत हे जवळपास गेले ४ वर्षापासुन मिळुन येत नव्हते.

गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक विश्लेषणाचे आधारे यातील आरोपीत हा त्याचा भाऊ सन्नी यादव मुळ रा. फिरोजाबाद, उत्तरप्रदेश याचे संपर्कात असलेबाबत माहिती प्राप्त झाल्याने गुन्हयाचे तपासादरम्यान प्रथमदर्शनी आरोपीत याचा भाऊ सन्नी यादव यास त्याचे मुळ गावी जावुन ताब्यात घेवुन त्याचेकडे तपास करणे गरजेचे असल्याने वालीव पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पथक यांनी फिरोजाबाद राज्य उत्तरप्रदेश येथे जावुन गुन्हयातील आरोपीत याचा भाऊ सन्नी रामबीर यादव यास ताब्यात घेवुन त्याचेकडे गुन्हयाचा तपास करता त्याने त्याचा भाऊ आरोपीत राजा यादव व गुन्हयातील अपहरीत अल्पवयीन मुलगी असे कामासाठी गाव-अबोहर, जिल्हा-फाजील्का, राज्य-पंजाब येथे गेलेले असलेबाबत माहिती प्राप्त झाल्याने लागलीच पथकाने आरोपीत याचा भाऊ यास सोबत घेवुन त्याने दिलेल्या माहितीचे आधारे राज्य-पंजाब येथे जावुन आरोपीत याचा शोध घेतला असता यातील आरोपीत नामे राजा रामबीर यादव, सध्या रा. धरमनगरी, अबोहर, जि. फाजील्का, राज्य-पंजाब हा यातील अपहरीत अल्पवयीन मुलीसह तेथे वास्तव्य करीत असताना मिळुन आल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आलेले आहे.

सदरची कामगिरी करणारे वालीव पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कैलास बर्वे, पो.नि. श्री. राहुलकुमार पाटील (गुन्हे), गुन्हे प्रकटिकरण पथकाचे स.पो.नि. ज्ञानेश फडतरे, पो.हवा. मुकेश पवार, मनोज मोरे, किरण म्हात्रे, सचिन दोरकर, सतीश गांगुर्डे, बाळु कुटे, पो.अंम. अभिजीत गढरी, विनायक राऊत, अमोल बर्डे, म.पो.अंम. प्रियंका पवार यांचा **“मे महिन्यातील गुन्हयाची उकल म्हणुन स्पेशल रिवॉर्ड” क्रमांक-३ देवुन मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय** यांनी सत्कार केला आहे.



मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना वपोनि. श्री. कैलास बर्वे

७) अर्नाळा सागरी पोलिस ठाणे गुन्हा रजि.नं.२३२/२०२३ भादविसं कलम ३६३,३५४,३७६ (२)(एन) पोस्को ४,८,१२ प्रमाणे गुन्हा दिनांक १५.०६.२३ रोजी पुर्वी घडला होता सदर गुन्हातील फिर्यादी यांचे मुलीस कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावुन पळवुन नेले होते सदर गुन्हाचे गांभीर्य लक्षात घेवुन सदर मुलगी राहत असलेल्या ठिकाणाच्या परिसरातील तसेच विरार रेल्वे स्टेशन येथील सीसीटीव्ही चे अवलोकन करुन, तांत्रिक तपासामध्ये सदर मुलीचे लोकेशन हे कलकत्ता असल्याने सदर अपहरित मुलगी व आरोपीत नामे शाहीन शहाजहान मुल्ला यास ताब्यात घेवुन गुन्हाची उकल करुन सदर मुलीस तिच्या आईवडीलांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी करणारे आर्नाळा पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कल्याणराव कर्पे, सपोनि बालाजी मुसळे,रणजीत परदेशी सफौ. मते पो.हवा. औतार, डांबरे,ढोणे, पो.अं. आळंगे, शिंगाळे यांचा **“जुन महिन्यातील गुन्हयाची उकल म्हणुन स्पेशल रिवॉर्ड” क्रमांक-४** देवुन **मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय** यांनी सत्कार केला आहे.



मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना वपोनि. श्री. कल्याणराव कर्पे

---ooo---